Book ... changes ...
...

D (4)

१५८/१ ...

RNI No. MAHBIL /2009/35527

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—क

वर्ष १, अंक ४०] शनिवार, सप्टेंबर २६, २०१५/आश्विन ४, शके १९३७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ७१**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाव्यतिरिक्त इतर वैधानिक प्राधिकाऱ्यांनी तयार केलेले (भाग एक, एक-अ व एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले वैधानिक नियम व आदेश यांव्यतिरिक्त इतर) वैधानिक नियम व आदेश ; यात भारत सरकार, उच्च न्यायालय, पोलीस आयुक्त, आयुक्त (राज्य उत्पादन शुल्क), जिल्हादंडाधिकारी व निवडणूक आयोग, निवडणूक न्यायाधिकरण, निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणूक आयोगाखालील इतर प्राधिकारी यांनी तयार केलेले वैधानिक नियम व आदेश यांचा समावेश होतो.**

**आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क**

ओल्ड कस्टम हाऊस, २रा मजला, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ०२३.

दिनांक २४ सप्टेंबर २०१५

**अधिसूचना**

**महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम**

क्रमांक एमएलएस. ११२०११/लाकृस/चार.— ज्याअर्थी, महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम (१९४९ चा मुंबई २५) चे कलम १४४ च्या उप-कलम (१) च्या खंड (अ) आणि (ब) नुसार आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, यांना प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून महाराष्ट्र मळी (साठवणूक आणि पुरवठा) विनियम, १९६५ मध्ये सुधारणा करण्यासाठी खालीलप्रमाणे विनियम करीत आहे, ते असे :—

१. **शीर्षक.**—या विनियमांना महाराष्ट्र मळी (साठवणूक आणि पुरवठा) विनियम (सुधारणा) २०१५ असे संबोधण्यात यावे.

२. महाराष्ट्र मळी (साठवणूक आणि पूरवठा) विनियम, १९६५ (ज्याचा उल्लेख पुढे ' प्रधान विनियम ' असा करण्यात आला आहे) च्या विनियम (६) मध्ये " वजनयंत्र आणि मापे " या शब्दांच्या ऐवजी " ब्युरो ऑफ इंडियन स्टॅण्डर्ड (BIS) यांनी प्रमाणित केलेले इलेक्ट्रॉनिक वजन काटा " हे शब्द अंतर्भूत करावेत.

३. प्रधान विनियमांच्या नियम (७) मधील सध्याच्या परंतुका ऐवजी खालीलप्रमाणे परंतुक समाविष्ट करण्यात यावे, ते असे :—

" परंतु असे की, मळी उत्पादन करणाऱ्या घटकाने पूर्णपणे आच्छादित आणि गळती नसलेल्या (लिक प्रुफ) सुस्थितीत असलेल्या स्टिलच्या टाकीत मळी साठवावी आणि मळी साठवणूक टाकीकडे नेणाऱ्या सर्व झडपा, दरवाजे आणि खिडक्या हे विस्तार होणाऱ्या धातुने बसविले पाहिजे व त्यांना राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या खात्याचे कुलूप लावून संरक्षित केले पाहिजे व त्याच्या किल्ल्या आयुक्तांनी पर्यवेक्षणासाठी नमूद केलेल्या अधिकाऱ्याजवळ ठेवल्या पाहिजेत (यापुढे त्यांना " अधिकारी " असे संबोधले जाईल).

४. प्रधान विनियमामधील विनियम (८) मधील " जर वजनकाटा विनिमय (६) नुसार देखभालीत नसेल तर मळीचे परिमाण आणि घनतेनुसार वजनाची खात्री करण्यात यावी, " हे शब्द वगळण्यात यावेत.

५. प्रधान विनियमांमधील विनियम (९) व (१०) वगळण्यात यावेत.

६. प्रधान विनियमांतील विनियम (१५) नंतर खालीलप्रमाणे विनियम समाविष्ट करण्यात यावा, तो असा :—

" (१६) उपरोक्त विनियमांमध्ये काहीही अंतर्भत असले तरीही, पूर्णपणे आच्छादित व गळती नसलेल्या (लिक प्रुफ) स्टिलच्या टाकी खेरीज मळीची साठवणूक करता येणार नाही."

विजय सिंघल,
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

५/५

**COMMISSIONER OF STATE EXCISE**

Old Custom House, 2nd Floor, Shaheed Bhagatsingh Marg, Fort,
Mumbai 400 023, dated 24th September 2015

*NOTIFICATION*

MAHARASHTRA PROHIBITION ACT.

No. MLS. 112011/RKS/IV.—In exercise of the powers conferred by sub clause (*a*) and (*b*) of sub-section (*1*) of section 144 of the Maharashtra Prohibition Act (Bom. XXV of 1949), the Commissioner of State Excise, Maharashtra State, hereby the makes the rules to amend the Maharashtra Molassess (Storage and Supply) Regulations, 1965, as follow, namely :—

1. *Short title*.—These regulations may be called the Maharashtra Molasses (Storage and Supply) Regulation (Amendment), 2015. " Notwithstanding anything contained in this regulations, molasses shall not be stored except in the leak proof fully covered steel tanks. "

2. In regulation 6 of the Maharashtra Molasses (Storage and Supply) Regulations, 1965 (hereinafter referred to as " the principal Regulations "), for the words " weighing machine or scale " the words " electronic weighments confirming to the Bureau of Indian Standard (BIS) " shall be substituted.

3. In regulation 7 of the principal Regulations, for the existing proviso the following proviso shall be substituted, namely :—

" Provided that, a producer of molasses shall store molasses in fully covered leak proof steel tanks which shall be kept in good condition. All openings, doors and windows leading to the steel storage tanks shall be fitted with expanded metal and secured with excise locks, the keys of which shall be kept by the officer appointed by the Commissioner for supervision (hereinafter referred to as " the officer ").

4. In regulation 8 of the principal Regulations, the words " If a weighing machine as provided by regulation 6 is not maintained, weight may be ascertained by volume and density of molasses. " shall be deleted.

5. The regulations 9 and 10 of the principal Regulations shall be deleted.

6. After regulation 15 of the principal Regulations, the following regulation shall be added, namely :—

" (16) Notwithstanding anything contained in these regulations, molasses shall not be stored except in the leak proof fully covered steel tanks."

VIJAY SINGHAL,
Commissioner of State Excise,
Maharashtra State, Mumbai.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI